ट्रकवर बसलेलं बदक



मराठी : अश्विनी बर्वे

ट्रकवर
बसलेलं
बदक

जॉकं जवळ खूप सारे
पाळीव प्राणी होते.



त्याच्याजवळ एक कुत्रा होता.

दोन मांजरं,

तीन बेडूक

चार सोनेरी मासे



पाच सफ़ेद उंदीर

आणि सशाची सहा पिल्ले!

“जैक,” आई म्हणाली,
तुझ्याजवळ खूप सारे पाळीव प्राणी आहेत.”
“आई जरा विचार कर!” जैक म्हणाला,
“कोणाजवळ इतके पाळीव प्राणी असू शकतात का?”
“हो,” आई म्हणाली. ”तुझ्याजवळ एवढे सारे पाळीव प्राणी आहेत. भू-भू, म्यांव-म्यांव सारखा मला त्यांचा आवाज येत असतो.”

“पों! पों! हा काही कोणत्या पाळीव प्राण्याचा आवाज नव्हता.

“पों! पों!”

तो एका ट्रकचा आवाज होता.

जैकच्या वडिलांचा एक पेट्रोल पंप होता.

त्याच्या बाहेर एक ट्रक उभा होता.

“पों! पों!”

ट्रकला डिझेल पाहिजे होते.



जैक बाहेर पळत आला.
बाहेर पेट्रोल पंपा समोर एक
ट्रक उभा होता.

वो ट्रक, तो ट्रक बदक आणि
कोंबड्यानी भरलेला होता.
“पों! पों!”

“मी मदत करू का बाबा?” जैकने विचारले.

“ट्रक मध्ये डिझेल भरून दे,” वडील म्हणाले. मग जैक डिझेल भरण्यासाठी पेट्रोल पंपावर पळत गेला.

त्याने ट्रकच्या टाकीत डिझेल भरले.

“टाकी पूर्ण भरली आहे,” जैकने ड्रायव्हरला सांगितले.

“एकुण डिझेल पाच डॉलरचे झाले.”

“धन्यवाद,” ट्रक ड्रायव्हर म्हणाला.

“हे घे पाच डॉलर. एक, दोन, तीन, चार, आणि पाच. आणि हे नाणं तुझ्यासाठी बक्षीस!”

त्यानंतर ट्रक ड्रायव्हर बदक आणि कोंबड्या घेवून तिथून गेला.



“क्वेक! क्वेक!”

तो ट्रकचा आवाज नव्हता. जैकने इकडे-तिकडे पाहिले. तो कोणाचा आवाज होता?

“क्वेक! क्वेक!”

जैकला एक छोटा पिवळा बदक दिसला. त्याने त्याला उचलून घेतले.

“अरे! तू ट्रकमधून खाली पडला का?” जैकने विचारले.

“तू काळजी करू नको बदका, तू माझा पाळीव बदक होवू शकतो.”

मग जैकने विचार केला,

“बघ माझ्याजवळ खूप सारे पाळीव प्राणी आहेत.” त्याने बदकाला आपल्या शर्टात ठेवले.

“तू सध्या इथे रहा,” त्याने बदकाला म्हटले.

“तू माझ्याजवळ राहू शकतो की नाही हे समजेपर्यंत तू इथेच रहा.”



मग जैक घरात पळत गेला.

“क्वेक! क्वेक!”

बघ, हा छोटा बदक किती जोरात आवाज करत आहे! “चूप रहा!” जैकने बदकाला म्हटले.

“हे काय आहे?” वडिलांनी विचारले.

“म्हणजे काय?” जैकने विचारले.

“तो क्वेक! आवाज की काय!”

“क्वेक काय? कसला आवाज!” जैकने विचारले.

“आई, तुला क्वेक! असा आवाज येतोय का?” वडील विचारत आहेत.

“कोणता आवाज, क्वेक काय?” आईने विचारले.

“बदकाचे क्वेक!” वडिलांनी विचारले.



“जैक, तुला क्वेक क्वेक आवाज येतोय का?” आईने विचारले.

“कोणता क्वेक! क्वेक?” जैकने विचारले.

“क्वेक! क्वेक! क्वेक! क्वेक!” मग छोट्या बदकाने परत आवाज दिला. त्याने डोकं बाहेर काढलं.

“क्वेक क्वेक!”

“जैक,” आईने विचारले.

“तुझ्याजवळ खूप सारे पाळीव प्राणी आहेत. आता तू त्या बदकाला परत कर!”

“मी तर फक्त मजा करत होतो आई,” जैक म्हणाला.

“बघ हं आता काही मजा नाही,” आई म्हणाली. “आता घरात कोणतेही पाळीव प्राणी येणार नाही!” त्या मोठ्या आवाजाच्या म्हणाली “बदकाला लगेचच परत कर.”

जैक, बदकाला त्या ट्रक पर्यंत परत नेवू शकत नव्हता. म्हणून तो बदकाला शहरात घेवून गेला. तो एका मिठाई दुकानात घेवून गेला.

“तुम्हांला लहानसा पिवळा बदक पाहिजे का?” त्याने त्या मिठाई दुकानाच्या मालकाला विचारले. “हो जरूर” मालक म्हणाला.

“अरे वाह! किती मोठा बदक आहे! त्याचे मास खूप स्वादिष्ट लागेल!” “तुम्ही त्याला शिजवून खाणार?” जैकने विचारले.

“असे करू नका. मला माझे बदक परत करा!”

मग जैक रस्त्यावर पुढे चालू लागला.

तिथे त्याला एक छोटी मुलगी दिसली.
“तुला एक छोटे पिवळे
बदक हवे का?” जैकने विचारले.
“जरूर!” मुलगी म्हणाली.



मुलगी आनंदाने उड्या मारू लागली.
“हो जरूर!”
“तू त्याला रोज खायला देईल?”
जैक म्हणाला. “हो,” मुलगी म्हणाली,
“मी त्याला रोज खायला देईल.”

“अच्छा, छोटा बदका,” जैक म्हणाला. “बरं झालं असतं मी तुला पाळू शकलो असतो, अच्छा!”

त्यानंतर जैक आपल्या घरी परत आला. तो आनंदी नव्हता. “जर मी त्या बदकाला माझ्याजवळ ठेवू शकलो असतो तर,” त्याने विचार केला.

तेव्हा आईने विचारले, “जैक, तू ते बदक परत केले?”

“हो, आई,” जैक म्हणाला. “मी त्याला परत केले.”

“क्वेक! क्वेक!”

“मग हा ‘क्वेक-क्वेक’ आवाज कुठून येत आहे?” आईने विचारले.

“कोणता क्वेक-क्वेक आवाज?” जैकने विचारले.

“तो क्वेक-क्वेक!” आईने विचारले.

“मैंने तो वो बत्तख किसी को दे दी,” “मी तर बदक कोणालातरी देवून टाकले.” जैक म्हणाला. “मी एका छोट्या मुलाला बदक दिले.”
मग जैकला छोटा बदक दिसले. “बघ!” जैक म्हणाला. “मी जिथे जातो तिथेच ते येते!”

“घरात आता कोणते पाळीव प्राणी नको,” आईने कडक आवाजात म्हटले.

जैकच्या वडिलांनी त्याला बोलावले.
“जैक तुला माझ्याबरोबर यायचे आहे का?
जैक? एक कार फसली आहे. मला तिथे
जाऊन मदत करायची आहे.”
“जरूर!” जैक म्हणाला. “मी पण आपल्या
बरोबर येतो!” मग जैक आपल्या
वडिलांबरोबर ट्रकमध्ये जावून बसला.
“त्या कारला आपली खूप गरज आहे!”
जैकचे वडील म्हणाले.



त्यानंतर ते पहाडावरून
खाली उतरले!

मग ते पहाडावर घाईने वर चढले.



जैकच्या वडिलांना काही लोक दिसले. त्यांना आपल्या ट्रकचा हॉर्न वाजवायचा होता. पण हॉर्न खराब होता. जैकच्या वडिलांना समजले नाही की अशावेळी काय करावे ते. त्यांना हॉर्न वाजवायची इच्छा होती. पण हॉर्न बिलकुल खराब झाला होता. ते पहाडावर खाली उतरले.

“क्वेक! क्वेक!”

ते बदक त्यांच्या ट्रक मध्ये होते.

“क्वेक! क्वेक!”

“बघा,” जैक म्हणाला. लोकांनी बदकाचा आवाज ऐकला आणि गर्दी रस्त्यावरून बाजूला झाली.

“किती छान झाले की तू आमच्या बरोबर आला!” जैक म्हणाला. “तू एक खूप चांगला छोटे बदक असून तुझा क्वेक-क्वेक आवाज बुलंद आहे.”



शेवटी जैकच्या वडिलांनी ट्रकला ब्रेक लावून गाडी थांबवली. वडील खूप खुश होते. जैकपण खुश होता. त्याने त्या छोट्या बदकाला उचलून कुशीत घेतले.

त्यानंतर लोक बदक बघायला पळाले. “आमचे भाग्यच की बदक ट्रकवर होते,” जैकचे वडील म्हणाले. “ट्रककडून बदकाला खूप खूप शुभेच्छा!”

बदकाने डावीकडे-उजवीकडे पाहिले.

“क्वेक!-क्वेक!” बदक म्हणाले.

“मला तुझे क्वेक क्वेक खूप आवडते.”

जैकचे वडील म्हणाले.

“कोणते क्वेक!” जैकने हसत विचारले.

“तुझ्या नव्या पाळीव बदकाची क्वेक!”

AIR